# जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा

## जिल्हापरिषद/ पंचायत समिती निवडणुक विभाग

# ई- निविदा

जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुक-२०१७ करीता जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा यांच्याकडून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. त्याकरीता इच्छुक पात्र कंत्राटदारांनी विहीत कालमर्यादेत सेवेकरीता ई-निविदा सादर करावी.

क्रमांक कावि/ जिपपसनि/ कक्ष १५/ / दिनांक /०१/२०१७

ई-टेंडर आय डी क्रमांक:-

कामाचे संक्षिप्त वर्णन खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं | कामाचे नांव | कोरी निविदा प्रपत्र किंमत | % इसारा रक्कम | % सुरक्षा अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रीक निवडणुक २०१७ संवेदनशिल घटनांची व्हिडीओग्राफी करणे संबधित कामे ( जिल्हयातील १३ पंचायत समिती निवडणुक क्षेत्राकरीता) | रु. २०००/- रुपये दोन हजार प्रती | रु. १०,०००/- रुपये दहा हजार | रु.५०,०००/- रुपये पन्नास हजार मात्र | जिल्हा परिषद/ पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०१७ ची प्रक्रीया संपेपर्यंत. |

## निविदेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| निविदा प्रसिध्दीची दिनांक व वेळ | दिनांक ९/१/२०१७ सकाळी १०.०० वाजता |
| ऑनलाईन निविदा डाऊनलोड करण्याची दिनांक व वेळ | दिनांक ९/१/२०१७ सकाळी १०.०० पासुन दिनांक १७/१/२०१७ सायकाळी ५.३० पर्यंत |
| ऑनलाईन निविदा भरण्याची प्रारंभ दिनांक व वेळ | दिनांक ९/१/२०१७ सकाळी ११.०० वाजेपासून |
| निविदा पुर्व सभा (Pre bid meeting) | दिनांक १२/०१/२०१७ सकाळी १२.०० वाजता (जिल्हाधिकारी कार्यलय बुलडाणा येथे) |
| ऑनलाईन निविदा भरण्याची अंतीम दिनांक व वेळ | दिनांक १७/१/२०१७ सायकाळी ५.३० वाजता |
| तांत्रीक लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ व ठिकाण | दिनांक १९/१/२०१७ सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा |
| निविदेचा दर असलेला लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ व ठिकाण | दिनांक २०/१/२०१७ सकाळी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा |

- # निविदेसंबंधी माहिती

- सदर कामाच्या निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर २ लिफाफा ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
  वरील कामाची संपुर्ण माहीती, अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व www.buldhana.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- **२ लिफाफ्यांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

**१. तांत्रीक लिफाफा क्रमांक ०१**

**ऑनलाईन तांत्रीक लिफाफयामध्ये खालील दस्तऐवज/ प्रमाणपत्र सादर करावेत.**

A. निविदा धारकाचे नांव संस्थेचे नांव
B. निविदा धारकाच/ संस्थेचा पत्ता/ दुरध्वनी क्रमांक व ईमेल आय डी
C. निविदाधारक संस्था प्रोप्रायटरशीप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमीटेड फर्म, सहकारी संस्था इत्यादी ज्याप्रकारची नोंदणी असेल त्याचे नोंदणी प्रमाणपत्र.
D. ऑनलाईन निविदा शुल्क/बयाना रक्कम अदा केल्याची पावती.
E. सेवाकर प्रमाणपत्र, ना देय दाखला ३१ मार्च २०१६ पर्यंतचे प्रमाणपत्र
F. विक्रीकर/सर्व्हीस टॅक्स नोंदणी दाखला.
G. पॅनकार्ड
H. मागील तीन वर्षाचे आयकर भरणा प्रमाणपत्र
I. लोकसभा/विधानसभा/जिल्हा परिषद निवडणूका/ शासकीय कार्यक्रम अथवा मोहीमेमध्ये व्हिडीओग्राफीचा / शुटींगचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र
J. उपलब्ध मनुष्यबळ/ कर्मचा-यांची यादी
K. शॉप ॲक्ट प्रमाणपत्र
L. निवीदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पवर नोटरी / कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले प्रतिज्ञापत्र
M. शासकीय / निमशासकीय कार्यालयाकडुन संस्था काळया यादीत नसल्याबाबतचे स्वघोषणापत्र
N. सदर निविदेकरिता निविदाधारकाचे Upload केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे स्वघोषणापत्र
O. नोंदणीकृत कामगार विमा प्रमाणपत्र.(निविदा कालावधीत वैध असलेले)

**२. निविदा दर लिफाफा क्रमांक ०२**

**ऑनलाईन निविदा दर लिफाफयामध्ये निविदेसोबत अपलोड केलेल्या BOQ मध्ये सर्व माहीती सह आपले दर भरुन सादर करावेत.**

-----------------------------------------------------------------------------

- **<u>निविदा माहीती, अटी व शर्ती :-</u>**

  *निविदेसंबंधी साधारण माहिति , अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.*

- निविदा केवळ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन माध्यमातुनच भरण्यात याव्यात. त्याकरीता निविदाधारकाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर खाते असणे अत्यावश्यक आहे.
- निविदा शुल्क/इसारा रक्कम ही सुध्दा फक्त ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाची आहे. ईतर कोणत्याही प्रकारे अदा करण्यात आलेली निविदा शुल्क/इसारा रक्कम ही ग्राह्य धरल्या जाणार नाही.
- अपुर्ण/चुकीचे दस्तऐवज/प्रमाणपत्रे सादर करणा-या निविदाधारकाच्या निविदा नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी. तसेच निविदा दर लिफाफ्यामधे सर्व दर भरणे आवश्यक आहे. अन्यथा असे अपुर्ण दरपत्रक सादर करणा-या निविदाधारकाच्या निविदा नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- सादर केलेल्या दस्तऐवज/प्रमाणपत्रावर कोणत्याही प्रकारची खोडतोड आढळल्यास अशा निविदाधारकाच्या निविदा नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.
- प्राप्त निविदा धारकांचा ऑनलाईन लिफाफा क्रमांक १ दि. १७ /०१/२०१७ रोजी दुपारी १०.०० वा. निविदा समिती यांच्या समक्ष जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा येथे उघडण्यात येईल. लिफाफा क्रमांक १ च्या तपासणी अंती पात्र ठरणा-या निविदाधारकांचीच निवीदा फक्त पुढील प्रक्रीयेसाठी विचारात घेण्यात येईल.
- निविदा उघडण्याची प्रक्रीया सुरु असतेवेळी एखादया निविदा धारकाने दाखल केलेली ई-निविदा काही कारणास्तव उघडण्यात येवु नये अशी विनंती अथवा लेखी अर्ज सादर केल्यास संबंधित निविदाधारकाने निवीदेसोबत जमा केलेले बयाना रकमेचे डीपॉझिट जप्त करण्यात येईल तसेच सदर निविदा अस्वीकृत करुन कार्यालयात जमा करण्यात येईल.
- लिफाफा क्रमांक १ ची तपासणी केल्यानंतर पात्र कंत्राटदार यांचा लिफाफा क्रमांक ०२ दिनांक १८/०१/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल. निविदेचे दर तपासुन निविदा समिती निविदेबाबत अंतीम निर्णय घेण्यात येईल.
- दोन किंवा अधिक प्राप्त निविदाधारकांच्या निविदेचा दर सारखाच असल्यास अशा बाबतीत कोणत्या निविदाधारकाची निविदा स्विकारण्यात येतील याबाबत सर्व अधिकार जिल्हाधिकारी बुलडाणा यांना राहतील.
- **छायाचित्रण करणे करीता वापरता येणारे सर्व साहीत्य अत्यंत उच्च प्रतीचे व दर्जेदार असणे आवश्यक आहे. छायाचित्रण केलेल्या छायाचित्राची गुणवत्ता उच्च प्रतीची असणे आवश्यक असते.**
- छायाचित्रण करणे करीता वापरणेत येणारे व्हिडीओ संच (कॅमेरा ई.) हे कंत्राटदाराच्या स्वत:च्या मालकीचे असणे आवश्यक आहे. छायाचित्रण झाल्यानंतर त्याची डी. व्ही. डी. तयार करुन द्यावी लागेल.
- **निविदाधारकास लोकसभा/विधानसभा/जिल्हा परिषद निवडणूका/ शासकीय कार्यक्रम अथवा मोहीमेमध्ये व्हिडीओग्राफीचा / शुटींगचा अनुभव असणे आवश्यक आहे.**
- निविदाधारकाने निविदेत कोणतीही सुचना/ अट समाविष्ट केल्यास ती निवीदा अपात्र ठरविण्यात येईल.
- चित्रीकरणाच्या कालावधीत कोणत्याही राजकीय पक्षाशी संधान साधता कामा नये तसेच राजकीय पक्षाकडुन आलेली कोणतीही सहानुभुती त्याने स्विकारता कामा नये.

- चित्रीकरण केलेली कोणतेही दृष्ये तांत्रीक दोषामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे चित्रफीतीमधुन रदद्र होता कामा नयेत. याची पुर्ण जबाबदारी निविदाधारक ठेकेदार/संस्थेची राहील.
- **संबंधित निवडणुक निर्णय अधिकारी तसेच निवडणुक शाखेतील वरीष्ठ अधिका-यांच्या सुचनेनुसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे बुलडाणा जिल्हयातील कोणत्याही पंचायत समिती कार्यक्षेत्रात व कोणत्याही वेळी चित्रीकरणाकरीता जाणे बंधनकारक आहे.**
- चित्रीकरणाकरीता प्रसंगी दंगलीत, जाहीर सभेत अथवा प्रसंगात उपस्थित राहून चित्रीकरण करावे लागेल. तसेच संबंधित निवडणुक अधिका-यास आवश्यक असलेल्या कोणत्याही वेळी चित्रीकरणाकरीता उपस्थित रहावे लागेल.
- चित्रीकरणाच्या वेळी झालेल्या नुकसानीस संबंधित ठेकेदार जबाबदार राहील.
- निवडणुक आयोगाने नमेलेले निरीक्षक ज्या-ज्या वेळेस मतदार संघात येतील त्या- त्या वेळेस निवडणुक शाखेतील अधिका-यांच्या सुचनेनुसार व्हिडीओग्राफरने तयार केलेली डी. व्ही. डी. प्लेअर संचावर  दाखविणेस कोणत्याही ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक आहे
- सदर निविदा स्विकारतांना व्हिडीओ कॅमेरा( चालकासहीत) चा न्युनतम दर आधारभूत धरण्यात येईल. मात्र केवळ न्युनतम दर असणे हाच केवळ निविदा स्वीकारण्याता अंतीम निकष असणार नाही.
- व्हिडीओग्राफीकरीता वापरणेत येणा-या डीव्हीडी  उत्तम प्रतीच्या असणे आवश्यक्र असुन नेहमी दोन डीव्हीडी आगाऊ बाळगणे  सक्तीचे आहे.
- निविदा धारक स्व्त: अथवा त्यांनी नियुक्त केलेले कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाचे असता कामा नये  किंवा कोणत्याही राजकीय पुढा-याच्या हितसंबंधी, नातेवाईक असता कामा नये.  तसेच त्याचेविरुध्द्र कोणताही फौजदारी गुन्हा दाखल/ प्रलंबीत असता कामा नये.
- निविदा मंजुर झालेल्या ठेकेदाराने जिल्हाधिकारी व बुलडाणा यांनी ठरवुन दिलेल्या विहीत नमुन्यात रु १००/-( रु. शंभर फक्त)च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक्र आहे.
- निविदा मंजुर झालेल्या ठेकेदारास रु. ५०,०००/- एवढ्या रकमेचा जिल्हाधिकारी  बुलडाणा यांच्या नावाने असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/बँक गॅरेंटी सुरक्षा अनामत म्हणुन द्यावी लागेल.
- निविदाधारकाच्या देयकामधुन नियमानुसार आयकर, त्यावरील अतिरक्त कर (Surcharge)  ई. शासनास देय होणारे कर कपात करण्यात येतील. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे  अग्रीम देण्यात येणार नाही.
- कोणत्याही अटीच्या अर्थाबददल किंवा इतर कोणत्याही बाबतीत  विवाद उदभवल्यास जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.
- निविदाधारकाने दर नमुद  करतांना त्यामध्ये  कामासाठी येणारा सर्व खर्च व भरावे लागणारे वेगवेगळे कर बाबी विचारात घेऊन दर नमुद करावा. यशस्वी निविदा धारकांस या कार्यालयाकडून कोणतेही शासकीय / निमशासकीय कराची रक्कम़ देण्यात येणार नाही. आणि  त्याबाबतच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र  देण्यात येणार नाही. ते नियमानुसार  आयकर व लागु  असणारे इतर कर वजा करुन देयक अदा करण्यात येईल.
- वरील पैकी कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपुर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास  संबंधित ठेकेदाराविरुध्द्र निवडणुक नियमानुसार व भारतीय दंडसंहीता(IPC) मधिल उचित कलमानुसार कारवाई केली जाईल.

- सदर निविदेसंदर्भातील कोणत्याही न्यायालयीन खटाला बुलडाणा जिल्हा न्यायालयाच्या कायक्षेत्रात चालविण्यात येईल.
- सदरची निविदा अगर निवीदेतील कोणताही भाग तसेच कांणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सूचना न देता रदद करणेचा/ राखुन ठेवणेचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी राखुन ठैवला आहे. आवश्यकतेनुसारच सेवेचा व वस्तुचा कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
- प्रक्रीयेदरम्यान कामाच्या स्वरुपात सुधारणा करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी बुलडाणा यांना राहतील. जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे सुचनेनुसार कंत्राटदारास आवश्यक ते बदल/सुधारणा करुन देणे बंधनकारक राहील.
- कंत्राटदाराकडे नोंदणीकृत कामगार विमा प्रमाणपत्र नसल्यास त्याच्या कामगारांच्या कामगार विम्याची रक्कम त्याला देय होणा-या वेतनातुन वजाती करुन शासनजमा करण्यात येईल.
- **प्रक्रीयेदरम्यान आवश्यकतेनुसार कामाच्या शर्ती व अटींमधे बदल/सुधारणा करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी बुलडाणा यांना राहतील.**

कार्यालयीन टिपणी मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे मान्यतेने.

**जिल्हाधिकारी बुलडाणा**

# <u>निविदाधारकाने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्राचा नमुना</u>

प्रति,

**जिल्हाधिकारी, बुलडाणा**

मी याद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा(जिल्हा परिषद **निवडणूक विभाग**) यांनी **जिल्हापरिषद/पंचायत समिती सार्वत्रीक निवडणुक २०१७ संवेदनशिल घटनांची व्हिडीओग्राफी करणे संबधित कामे ( जिल्हयातील १३ पंचायत समिती निवडणुक क्षेत्राकरीता)** या कामाकरीता आमंत्रित केलेल्या ऑनलाईन निविदा प्रक्रीयेमधे तांत्रिक/व्यापारी लिफाप्यात माझी निविदा सादर करीत आहे.

निवीदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्यास मी बांधील आहे.

मी याद्वारे प्रतिज्ञा करतो की, मी सादर केलेली निविदा मंजुर झाल्यास निवीदेतील कामकाज मी विहित मुदतीत योग्य रीतीने पार पाडेन व या कामकाजासाठी आवश्यक साहीत्य/मनुष्यबळ उपलब्ध करुन देईन. तसेच मी निवीदेद्वारे जे शासकीय काम देण्यात येईल त्याबाबत पुर्णत: गुप्ततेची हमी घेत आहे.. मा.जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे लेखी सुचनेनुसार काम करणे बंधनकारक राहील. तसेच स्वीकृत केलेल्या निवीदेचा अंतिम दर हा मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या मान्यतेस अधिन राहुन व त्यांनी मंजुर केलेला दर मला मान्य राहील.

मला हयाबाबत पुर्ण कल्पना आहे की, माझया कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर / दिरंगाई झाल्यास जिल्हाधिकारी निश्चीत करतील अशा दंडास मी पात्र राहीन.

**निविदा धारकाची स्वाक्षरी**

१. निविदा ज्यांकडुन दाखल करण्यात आल्या त्या संस्था / उदयोगाचे नाव व पत्ता :-
------------------------------------------------------------------------------------------------------------

२. निविदा धारकाचे संपुर्ण नाव व पत्ता :- ---------------------------

दुरध्वनी क्रमांक :-

मोबाईल क्रमांक :-

साक्षीदार :-

**१. ------------------------------------------------------------------ रा.--------------------**

**(स्वाक्षरी)**

**२. ------------------------------------------------------------------ रा.--------------------**

**(स्वाक्षरी)**

# <u>निविदाधारकाने सादर करावयाचे स्वयंघोषणापत्र नमुना</u>

मी -------------------------------------------------- रा. ----------------------------- वय ---------

सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो की, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा(जिल्हा परिषद **निवडणूक विभाग**) यांनी **जिल्हापरिषद/पंचायत समिती सार्वत्रीक निवडणुक २०१७ संवेदनशिल घटनांची व्हिडीओग्राफी करणे संबधित कामे ( जिल्हयातील १३ पंचायत समिती निवडणुक क्षेत्राकरीता)** या कामाकरीता ई-निविदा सुचना सन २०१७ करिता -------------------------------------------------- या फर्मने निविदा सादर केलेली असुन सदर निवीदेकरीत मी www.mahatenders.gov.in या ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड केलेले सर्व कागदपत्रे / माहिती खरी असुन सदर कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास भा.द.वि कलम १९९, २०० अन्वये मी शिक्षेस पात्र राहील.

ठिकाण:-

दिनांक : / /२०१७

**स्वघोषणापत्र करणाराची सही व नाव**

**साक्षीदाराची सही :- -----------------------------------------------------**

**नाव :- --------------------------------------------------------------------**

**पत्ता :- -------------------------------------------------------------------**